**ठळक बातम्या**

- आजचा भारत कौशल्य विकासाला प्राधान्य देत असून युवावर्गाचे सामर्थ्य देशाला प्रगतीपथावर नेईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- देशभरात ६२ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध युवक-केंद्रित उपक्रमांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते अनावरण

- दोन वर्षांहून कमी वयाच्या बालकांना सर्दी-खोकल्याची औषधं देऊ नयेत, अशा केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना सूचना

**आणि**

- भारत-वेस्ट इंडिज कसोटी क्रिकेट मालिकेत भारताचा पहिला डाव ४४८ धावांवर घोषित, दुसऱ्या डावात वेस्ट इंडिजची फलंदाजी गडगडली

**<><><><><>**

आजचा भारत कौशल्य विकासाला प्राधान्य देत असून युवावर्गाचं सामर्थ्य देशाला प्रगतीपथावर नेईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज देशभरात शिक्षण, कौशल्य आणि उद्योजकतेला चालना देण्याऱ्या ६२ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध युवक-केंद्रित उपक्रमांचं अनावरण केलं, त्यावेळी ते बोलत होते. नवी दिल्लीत विज्ञान भवन इथं आयोजित कौशल्य दीक्षांत समारंभाला संबोधित करताना प्रधानमंत्री म्हणाले…

**- - - होल्ड… बाईट - प्रधानमंत्री - -**

कौशल्य वाढल्यावर देश आत्मनिर्भर होतो, निर्यात वाढल्यास रोजगाराच्या संधींमध्ये वाढ होते त्यामुळे कौशल्यवृद्धी साठीच्या पी एम सेतू योजनेमुळे भारताचा युवावर्गाला जगाच्या कौशल्य मागणीशी जोडला जाईल, असं ते म्हणाले.  देशातल्या आयटीआय अर्थात औद्योगिक प्रशिक्षण संस्था केवळ प्रशिक्षणापुरत्या मर्यादित

नसून त्या आत्मनिर्भर भारताच्या कार्यशाळा आहेत. देशात उत्पादकता, रोजगार, संरक्षण क्षेत्रातली उत्पादकता वाढली आहे, एम एस एम ई मध्ये रोजगार वृद्धी होत आहे, याचा लाभ भारताच्या युवाशक्तीला होत आहे, असं ते म्हणाले.

प्रधानमंत्री विकसित भारत योजनेमुळे देशातल्या सुमारे साडे तीन कोटी युवकांना खाजगी क्षेत्रात नोकरी मिळण्याची द्वारे खुली होतील. बिहारमधल्या युवकांना बिहार मध्येच रोजगार मिळावा, यासाठी प्रयत्न सुरु आहेत, असं त्यांनी सांगितलं. यावेळी कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधल्या सर्वोत्तम ४६ जणांना प्रधानमंत्र्यांच्या हस्ते गौरवण्यात आलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यसैनिक श्यामजी कृष्ण वर्मा यांना जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली आहे. श्यामजी कृष्ण वर्मा भारतमातेचे वीर सुपुत्र होते, स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी दाखवलेलं शौर्य, समर्पण आणि राष्ट्रसेवा आपल्या कायम स्मरणात राहील, त्यांच्या शौर्याची आणि निर्भयतेची गाथा विकसित भारताच्या उभारणीसाठी एक मोठी प्रेरणा आहे, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. तर भारतीयांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना जागृत करणाऱ्या श्यामजी कृष्ण वर्मा यांना अभिवादन, अशा शब्दात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानाअंतर्गत ६ कोटी ५० लाख महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. देशभरात सुमारे १८ लाख आरोग्य शिबिरं आयोजित करण्यात आली. हा ऐतिहासिक टप्पा असल्याचं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी म्हटलं आहे. १७ सप्टेंबरला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या अभियानाची सुरुवात केली होती. २ ऑक्टोबरला या

अभियानाची सांगता झाली. हे अभियान महिलांचं आरोग्य आणि सशक्त, समृद्ध कुटुंबांना केंद्रस्थानी ठेवण्याच्या देशाच्या सामूहिक संकल्पाचं प्रतीक असल्याचं नड्डा यांनी समाजमाध्यमावरच्या एका पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

बिहार मधल्या आगामी निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी निवडणूक आयोग आज मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातल्या १२ प्रमुख राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशी चर्चा करणार आहे. निवडणूक आयुक्त डॉक्टर सुखबीर सिंग संधु आणि डॉक्टर विवेक जोशी देखील यावेळी उपस्थित असतील. याशिवाय निवडणूक आयोग स्थानिक प्रशासन आणि पोलिसांशी देखील संवाद साधणार आहे.

**<><><><><>**

नागपूर हे देशाच्या मध्यभागी असून नागपूरमधे देशाचं हवाई वाहतूक क्षेत्राचं केंद्र बनण्याची क्षमता असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. विकसित भारतामधे हवाई वाहतूक क्षेत्राची भूमिका या विषयावर नागपूरमधे आयोजित परिसंवादात ते बोलत होते. हवाई वाहतूकक क्षेत्राच्या सुरक्षिततेबद्दल कुठलीही तडजोड न करता या क्षेत्राला आत्मनिर्भर करावं असं आवाहन गडकरी यांनी केलं.

**<><><><><>**

दोन वर्षांहून कमी वयाच्या बालकांना सर्दी-खोकल्याची औषधे दिली जाऊ नयेत, अशी सूचना केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं दिली आहे. राजस्थान आणि मध्य प्रदेशमध्ये कथित कफ सिरपच्या सेवनानं काही मुलांचे मृत्यू झाल्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं हा सल्ला दिला आहे. पाच वर्षांहून कमी वयाच्या मुलांना साधारणपणे ही औषधे दिली जात नाहीत आणि पाच वर्षांपेक्षा मोठ्या वयाच्या मुलांसाठी या औषधांचा वापर सावधगिरीनं आणि डॉक्टरांच्या देखरेखीखाली करणं

आवश्यक आहे, असं मंत्रालयानं जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये म्हटलं आहे. सर्व राज्य आणि केंद्र शासित प्रदेशांच्या आरोग्य सेवा संचालकांना पत्र लिहून या सूचना केल्या आहेत.

दरम्यान, मध्य प्रदेशमध्ये कफ सिरपच्या सेवनानं मुलांचे मृत्यू झाल्यासंदर्भात एक अहवाल आला. त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र, राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था आणि केंद्रीय औषध मानक नियंत्रण संस्थेच्या प्रतिनिधींच्या एका संयुक्त पथकानं घटनास्थळाची पाहणी केली. तेथील औषधांचे अनेक नमुने संकलित केले.

राजस्थान सरकारनं औषध नियंत्रक राजाराम शर्मा यांचं निलंबन केलं आहे आणि केसन फार्मा कंपनीच्या सर्व १९ औषधांचं वितरण रोखलं आहे. मुख्यमंत्री मोफत औषध योजनेअंतर्गत वितरित कफ सिरपाच्या सेवनानं कथित दोन मुलांचा मृत्यू आणि अन्य मुले आजारी पडल्याच्या घटनेनंतर ही कारवाई करण्यात आली.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कररचनेतल्या सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू झाल्या आहेत. यानुसार ट्रक, डिलिव्हरी व्हॅन यासारख्या मालवाहतूक करणाऱ्या व्यावसायिक वाहनांवरचा जीएसटी २८ टक्क्यांवरून १८ टक्के करण्यात आला आहे. लघु आणि मध्यम मालवाहतूकदारांना सुलभपणे मालवाहतूक करता यावी या उद्देशानं केलेल्या या कर कपातीमुळे देशातल्या दळणवळण क्षेत्राचं पुनरुज्जीवन होऊ शकेल. जीएसटी कमी झाल्यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या प्रति टन वाहतुकीचा दर कमी होऊन पुरवठा साखळीवर अनुकूल परिणाम होईल, तसंच निर्यातीतली स्पर्धा वाढेल.

**<><><><><>**

शक्ती चक्रीवादळाचं केंद्र गुजरातच्या द्वारकेहून सुमारे ३४० किलोमीटर पश्चिमेकडे असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे. पश्चिमेकडून

नैऋत्येकडे पुढे सरकत या चक्रीवादळाची तीव्रता वाढणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. हे चक्रीवादळ उद्यापर्यंत उत्तरेकडच्या मध्यवर्ती भागांपर्यंत आणि त्याला लागून असलेल्या अरबी समुद्राच्या मध्यापर्यंत पोहोचेल. सोमवारी ते पुन्हा फिरून पूर्व-इशान्येकडे सरकणार आहे.

**<><><><><>**

वेस्ट इंडिजविरूद्धच्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारत विजयाच्या उंबरठ्यावर आहे. भारताच्या ४४८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजचे अवघ्या १३२ धावांवर ९ फलंदाज तंबूत परतले आहेत. दुसऱ्या डावाला सुरुवात केल्यानंतर वेस्ट इंडिजचा संघ मैदानात तग धरू शकला नाही. वेस्ट इंडिजच्या धावांचं शतक पूर्ण व्हायच्या आतच त्यांचे ८ गडी बाद झाले होते. रविंद्र जडेजानं तीन तर मोहम्मद सिराजनं एक गडी बाद केला.

**<><><><><>**

महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा सामना पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तान बरोबर उद्या श्रीलंकेतल्या कोलंबो इथल्या आर प्रेमदासा स्टेडियमवर होणार आहे. पाकिस्तानबरोबर आतापर्यंत झालेल्या सर्व प्रकारच्या सामन्यांमध्ये भारतानं २७ पैकी २४ सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात बरेली परिसरातल्या दंगलग्रस्त भागाला आज समाजवादी पार्टीचं शिष्टमंडळ भेट देणार असल्याच्या वृत्ताच्या पार्श्वभूमीवर, पोलीस दल विशेष सतर्कता बाळगत आहे. या भागात भेट देण्यासाठी पोलिसांनी कोणत्याही शिष्टमंडळाला परवानगी दिलेली नाही. २६ सप्टेंबरला झालेल्या हिंसक घटनांनंतर पोलिसांनी आतापर्यंत ८३ जणांवर कारवाई केली आहे. तौकीर रझा याचं समाजमाध्यम हाताळणाऱ्या मुनीर इद्रसी याला पोलिसांनी अटक केली आहे.

**<><><><><>**

जपानच्या सत्तारुढ लिबरल डेमोक्रेटिक पक्षानं साने ताकाइची यांची पक्षाच्या नेतेपदी निवड केली. त्यांची येत्या १५ ऑक्टोबरपर्यंत जपानच्या प्रधानमंत्रीपदी निवड होणार आहे. जपानच्या पहिल्या महिला प्रधानमंत्री होण्याचा मान त्यांना मिळणार आहे.

**//<><><><><>//**